# नमुना प्रश्नपत्रिका

**वर्ग: बी.ए. भाग तीन**

**पेपर क्र.: XIV**

**पेपरचे नाव: मराठा सत्तेचा विकास आणि ह्रास ( इ. स. 1707 ते 1818 )**

**प्राध्यापकाचे नाव: प्रा. एस. एस. मारकवाड**

**इतिहास विभाग, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर**

**एकूण गुण: 70**

**वेळ: 2 तास 30 मिनिटे**

**प्रश्न पहिला: योग्य पर्याय निवडा.** **( गुण: 14 )**

**1.** पहिला माधवराव यांना .......... रोजी पेशवाईची वस्त्रे मिळाली.

अ) 20 जुलै 1761 ब) 15 जुलै 1761 क) 10 जुलै 1761 ड) 05 जुलै 1761

2. पहिला माधवरावास पेशवाईची वस्त्रे मिळाली तेव्हा सखारामाबापुस दिवाणगिरीची तर आबा पुरंदरे यास .......... ची वस्त्रे मिळाली.

अ) सल्लागार ब) सेनापती क) मुतालिक ड) यापैकी नाही

3. राघोबादादा उर्फ रघुनाथराव हा पहिल्या बाजीरावाचा मुलगा असून नानासाहेब पेशव्याचा .......... होता.

अ) धाकटा भाऊ ब) मोठा भाऊ क) काका ड) यापैकी नाही

4. नारायणरावाच्या आईचे नाव .............. होते.

अ) गोपिकाबाई ब) आनंदीबाई क) ताराबाई ड) सईबाई

5. जानोजी भोसले हे ........... येथील कुलमुखत्यार होते.

अ) पुणे ब) कोल्हापूर क) नागपूर ड) सातारा

6. सुरतेचा तह रघुनाथराव व ............. यांच्यात झाला.

अ) फ्रेंच ब) डच क) इंग्रज ड) पोर्तुगीज

7. खर्ड्याच्या लढाईत ............ यांचा पराभव झाला.

अ) मराठे ब) निजाम क) इंग्रज ड) फ्रेंच

**8.** पेशवेकाळात सत्तेचे केंद्रीकरण........... येथे झाले.

अ) कोल्हापूर ब) सातारा क) पुणे ड) मुंबई

9. मराठा मंडळाची निर्मिती ........... यांनी केली.

अ) छ. शाहू  ब) छ. संभाजी  क) छ. राजाराम  ड) महाराणी ताराबाई

10. पेशवे दप्तर ......... या ठिकाणी होते.

अ) सातारा  ब) पुणे  क) नागपूर  ड) कोल्हापूर

11. पेशवेकाळात ........... प्रमुख खाती होती.

अ) 18  ब) 12  क) 10  ड) 15

12. इ. स. 1763 मधील राक्षसभुवनची लढाई पहिला माधवराव आणि ............. यांच्यात झाली.

अ) इंग्रज  ब) हैदर अली  क) टिपू सुलतान  ड) निजाम

13. सन 1772 मध्ये झालेल्या ............. च्या लढाईत माधवरावाने हैदरअलीचा पराभव करून किंकेरीचा तह केला.

अ) मोतीतलाव  ब) मदगिरी  क) म्हैसूर  ड) अनवडी

**14**. दुसऱ्या बाजीरावाने ........... नुसार तैनाती फौजेचा स्वीकार केला..

अ) वसईचा तह  ब) वडगावचा तह  क) पुण्याचा तह  ड) देवगावचा तह

**प्रश्न दुसरा: थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतीही चार) (गुण 16)**

1. पेशवा पहिला माधवराव यांची कामगिरी थोडक्यात लिहा.
2. खर्ड्याच्या युद्धाची थोडक्यात माहिती लिहा.
3. नारायणरावाच्या वधाचे वर्णन करा.
4. दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाची चर्चा करा.
5. पेशवेकालीन न्यायव्यवस्था स्पष्ट करा.
6. बारभाई कारस्थानाची माहिती लिहा.

**प्रश्न तिसरा : टिपा द्या. (कोणतेही दोन) (गुण: 12)**

1. पेशवा पहिला माधवराव यांचे दक्षिण धोरण
2. मराठा – म्हैसूर संबंध
3. तिसरे इंग्रज-मराठा युद्ध
4. पेशवेकालीन लष्करी व्यवस्था

**प्रश्न चौथा: पेशवा पहिला माधवराव आणि रघुनाथराव यांच्यातील संघर्षाची माहिती लिहा.**

**(गुण: 14)**

किंवा

**पहिल्या इंग्रज-मराठा युद्धाची थोडक्यात माहिती लिहा.**

**प्रश्न पाचवा: मराठा सत्तेच्या अस्ताची कारणे स्पष्ट करा. (गुण: 14)**